पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५१८/२०१८
दिनांक : ०९/०८/२०१८

प्रति,

मा......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **१८/०८/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शनिवार** दिनांक **१८/०८/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०८**

दिनांक : **१८/०८/२०१८** वेळ : स.**११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शनिवार** दिनांक **१८/०८/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक ०३/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ७) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'ॲनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ज्ञ)' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. 'ॲनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ज्ञ)' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता,अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'ॲनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ज्ञ)' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती.प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली

शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.शिंदे सुरेखा संभा यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ज्ञ)' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, डॉ.शिंदे सुरेखा संभा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ज्ञ)' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १८/०८/२०१८ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.नांगरे सुजाता नारायण यांना अनु.जाती प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, डॉ.नांगरे सुजाता नारायण यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६००

मध्ये 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १८/०८/२०१८ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

**विषय क्र.३)** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील जुने/निरुपयोगी भंगार साहित्य नेहरुनगर येथील गोडावुन व अन्य ठिकाणी जमा करुन ठेवण्यात आलेले आहे. सदरचे साहित्य निरुपयोगी झाले असुन फेरवापरास अयोग्य असल्याचे संबधित विभागप्रमुख यांनी प्रमाणीत केलेले आहे. प्रस्तुत साहित्याची शासकिय मुल्यांकनदार मे.ए.व्ही.शेवडे अन्ड असोशिएट पुणे यांचेक्रडुन प्रत्यक्ष पहाणी करुन (मुल्यांकन) अंदाजे विक्रीमुल्य काढणेत आलेले आहे. त्यानुसार मनपाचे विविध विभागाकडील भंगार साहित्याचे एकुण अंदाजे विक्रीमुल्य र.रु **1,35,89,860**/-(र.रु.अक्ष**री** र.रु.एक कोटी पस्तीस लाख एकोन्नवद हजार आठशें साठ फक्त) कळविले आहे. प्रस्तुत किंमत चालू बाजारभाव गृहीत धरुन अंदाजे काढण्यात आलेली आहे. उक्त भंगार साहित्याची किंमत अंदाजे असल्याने प्रत्यक्ष खुल्या लिलावात कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत साहित्याची विक्री/विल्हेवाट खुल्या लिलावाने करणे प्रस्तावीत आहे. सदर लिलावासाठी महानगरपालिका अति.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मुख्य लेखापरिक्षक मुख्य लेखापाल, भांडार अधिकारी व संबधित विभागाचे शाखाप्रमुख यांची लिलाव समिती गठीत करण्यात येत आहे. सदर भंगार साहित्याची अंदाजे किंमत र.रु.**1,35,89,860**/- (अक्षरी र.रु.एक कोटी पस्तीस लाख एकोन्नवद हजार आठशें साठ फक्त) इतकी आहे. उपरोक्त नमुद केलेनुसार महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम मधील कलम ७९ (क) नुसार महापालिकेची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता विक्री करणेस महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार उक्त भंगार साहीत्याची विक्री लिलाव समितीचे निर्णयानुसार लिलावाव्दारे करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सेभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.४)** पिंपरी चिंचवड महानगर पालिका क्षेत्रासाठी नव्याने पोलीस आयुक्तालय होणार असुन त्यासाठी प्रेमलोक पार्क चिंचवड येथील महात्मा ज्योतीबा फुले इंग्लीस स्कुल च्या इमारतीची निवड करणेत आलेली आहे. सदर कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम जुन्या तालेरा हॉस्पिटलची इमारत पाडून नविन इमारत बांधणे. या कामातुन करता येणे शक्य आहे. सदर कामाचे आदेश मे.एस.एस.साठे यांना क्र.स्था/नि/2-ब/329/2018 दिनांक 1/03/2018 अन्वये निर्गत करणेत आलेले आहेत. सदर कामांतर्गत विद्युत विषय कामाची नि.र.रू.15,21,35,406/- एवढी असुन तांत्रिक मान्यता र.रू.16,27,84,885/- एवढी आहे. तसेच पोलिस आयुक्त कार्यालयाचे इमारतीसाठी अंदाजे र.रू.43,00,000/- (अंदाजे र.रू.त्रेचाळीस लाख फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च एकुण कामाच्या 2.82% एवढा होणे अपेक्षित आहे. सदरचे कामाचे साईटमध्ये बदल होणार असलेने काम करुन घेण्यास मा.विधी समिती सभेची मान्यता घेणे

आवश्यक आहे. तसेच सदरचे काम मे.एस.एस.साठे यांनी करण्यास तयार असले बाबतचे संमती पत्र दिलेले आहे. तरी प्रेमलोक पार्क चिंचवड येथे नव्याने होणा-या पोलिस आयुक्तालयाच्या इमारतीचे विद्युत विषयक कामे "जुन्या तालेरा हॉस्पिटलची इमारत पाडुन नविन इमारत बांधणे" या कामातुन करून घेण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५१८/२०१८
दिनांक : ०९/०८/२०१८ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc